Yakshagana report.pdf

Alumni activities.pdf

Alumni meet Sept 2015.pdf

GSS College 1999 batch students Reunion 27 April 2019.pdf

1996 Alumni meet.pdf

Alumni meet 8 Oct 2017.pdf

Yakshagaana Programme by Shri Suresh Hegde and team organised by Alumni Association and Language Department

https://www.facebook.com/pramod.hanamgond/posts/1434773446543398

ಜಿ.ಎಸ್.ಎಸ್. ಮಹಾವಿದ್ಯಾಲಯ, ಬೆಳಗಾವಿ

## "ಸುಧನ್ವಾರ್ಜುನ" ಯಕ್ಷಗಾನ ಕಾರ್ಯಕ್ರಮ

## ಶ್ರೀ ಸುರೇಶ ಆರ್ ಹೆಗ್ದೆ, ನಿವೃತ್ತ ಭೂವಿಜ್ಞ್ಯಾನಿ, ಬೆಳಗಾವಿ ಮತ್ತು ವೃಂದ

ದಿನಾಂಕ 11 ಎಪ್ರಿಲ್ 2017 ಸಾಯಂಕಾಲ: 6.30 pm

ಸ್ಥಳ: ಕೆ.ಎಮ್.ಗಿರಿ ಸಭಾಂಗಣ

### ಹಿಮ್ಮೇಳ:

೧) ಭಾಗವತರು: ಶ್ರೀ ಮಂಜುನಾಥ ಹೆಗ್ದೆ, ಸಿರ್ಸಿ

೨) ಮೃದಂಗ: ಶ್ರೀ ಶ್ರಿಪಾದ ಭಟ್, ಸಿರ್ಸಿ

೩) ಚೆಂಡೆ: ಶ್ರೀ ಉಮೇಶ ಹೆಗ್ದೆ, ಯೆಲ್ಲಾಪುರ

೪) ರಂಗ ಮತ್ತು ವೇಷ ಭೂಷ : ಶ್ರೀ ಪ್ರಶಾಂತ ಹೆಗ್ದೆ ಮತ್ತು ವೃಂದ, ಯೆಲ್ಲಾಪುರ

### ಮುಮ್ಮೇಳ: ಪಾತ್ರಧಾರಿಗಳು

೧) ಅರ್ಜುನ : ಶ್ರೀ ಸುರೇಶ ಆರ್ ಹೆಗ್ದೆ, ನಿವೃತ್ತ ಭೂವಿಜ್ಞ್ಯಾನಿ, ಬೆಳಗಾವಿ

೨) ಸುಧನ್ವ: ಪ್ರವೀಣ ಹೆಗ್ದೆ, ಸಿರ್ಸಿ

೨) ಶ್ರೀಕೃಷ್ಣ : ಹರ್ಷ ಭಟ್, ಸಿರ್ಸಿ

೪) ಬಾಲಗೋಪಾಲ ಮತ್ತು ಹೃಶಿಕೇಷ: ಕುಮಾರ್ ಅನ್ಮಿಷ್ ಹೆಗ್ದೆ, ಶ್ರೀ ಸುರೇಶ ಆರ್ ಹೆಗ್ದೆ ಅವರ ಮೊಮ್ಮಗ ($5^{th}$ Std MVM)

೫) ಬಾಲಗೋಪಾಲ : ಕುಮಾರಿ ದಿಶಾ ಹೆಗ್ದೆ, ಶ್ರೀ ಸುರೇಶ ಆರ್ ಹೆಗ್ದೆ ಅವರ ಮೊಮ್ಮಗಳು






ALUMNI ASSOCIATION

# ...तरच कलामांच्या संकल्पनेतील देश घडेल

## जीएसएसच्या १९६८ ते १९७२ च्या बॅचच्या विद्यार्थ्यांचा पुनर्मिलन सोहळा

प्रतिनिधी

बेळगाव

ज्या दिवशी या देशाचे नेतृत्व शिक्षक करतील त्यावेळी हा देश खऱ्या अर्थाने अब्दुल कलामांच्या संकल्पनेत बसेल. यासाठी शिक्षकांनी चांगल्यात चांगले शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना घडविण्याची गरज आहे. फक्त सुशिक्षित करून चालणार नाही, तर विद्यार्थी सुसंस्कृत झाला पाहिजे, असे उद्गार तरुण भारतचे समूहप्रमुख आणि सल्लागार संपादक किरण ठाकुर यांनी काढले.

येथील जीएसएस कॉलेजच्या १९६८ ते १९७२ च्या बॅचमध्ये शिकलेल्या माजी विद्यार्थ्यांचा पुनर्मिलन सोहळा रविवारी आयोजित करण्यात आला होता. फक्त विद्यार्थीच नव्हे तर त्या वेळचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही खास आमंत्रित करण्यात आले होते. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरून ठाकुर बोलत होते.

व्यासपीठावर एसकेई सोसायटीचे उपाध्यक्ष एस. वाय. प्रभू, प्राचार्य आनंद मेणसे, पदवीपूर्व विभागाचे प्राचार्य एस. एन. देसाई आदी मान्यवर उपस्थित होते.

तब्बल ४३ वर्षांनी एकत्रित आलेल्या या बॅचच्या निमित्ताने जुन्या आठवणींनी भारून टाकले आहे, असे किरण ठाकुर म्हणाले. जीएसएस स्थापनेमागे आपले वडील बाबुराव ठाकुर यांचे योगदान मोठे आहे. तात्या आजगावकर आणि आपल्या वडिलांनी यासाठी रक्त आटवलंय. यामुळेच तीन लाखांहून अधिक विद्यार्थी चांगल्या तऱ्हेने शिक्षण घेऊन येथून बाहेर पडले, जगात गेले आणि मोठे झाले, असे ते म्हणाले.

या मंडळींची एकच अपेक्षा होती दर्जात्मक शिक्षण द्यायचे. त्यांच्याबरोबर वयाच्या चौथ्या वर्षापासून या कॉलेजमध्ये आपण येत असून आज एकूण ५९ वर्षे या परिसराशी माझा संबंध आहे असे सांगताना कॉलेजच्या सुधारणेचा, १९९४ मध्ये झालेल्या सुवर्ण महोत्सवी समारंभाचा तसेच इतर अनेक उपक्रमांचा त्यांनी उल्लेख केला. फर्ग्युसन कॉलेजनंतर दर्जात्मक शिक्षण देणारं हे एकमेव कॉलेज आहे. इथे शिकलेल्यांना त्याचा जरूर आनंद आहे, असेही ते म्हणाले.

### एक लाख जणांना नोकरी देण्याचा उद्देश

वडील बाबुराव ठाकुर यांच्या प्रेरणेतून केलेल्या आपल्या वाटचालीबद्दल बोलताना त्यांनी तरुण भारत, एकूण आवृत्त्यांचा विस्तार, 'लोकमान्य'ची स्थापना आणि तेथून जांबोटीसारख्या दुर्गम भागात तसेच सावंतवाडी या ठिकाणी सुरू केलेल्या शैक्षणिक कार्याची माहिती दिली. आणखी काही वर्षांत किमान एक लाख जणांना नोकरी आणि १० लाख मंडळींना उद्योगाच्या माध्यमातून अप्रत्यक्ष मदत करण्याचा आपला उद्देश आहे, असे त्यांनी सांगितले.

माणिक फडणीस-फडके यांच्या स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. एस. वाय. प्रभू यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

### शिक्षकांचा गौरव

फक्तच माजी विद्यार्थ्यांनी न जमता या कार्यक्रमाला तत्कालीन शिक्षकांनाही आमंत्रित करण्यात आले होते. कॅनडा येथून आलेल्या तत्कालीन प्राध्यापिका लोरेटा रोबेलो, प्राचार्य ए. एस. देशपांडे, एम. के. भंडारे तसेच प्रा. ए. डी. मनोहर, एन. आर. अडूर, डॉ. डी. आय. दिनदार, जे. राजेंद्र, ए. ए. खानोलकर, डी. ए. नाडगौडा, एस. व्ही. कामत, एस. डी. धर्मट्टी, एस. एन. सुंठकर, व्ही. बी. मजली, ए. पी. हुंदगुंद, ए. बी. नाईक, एच. जी. गोरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच आर. बी. जोशी, आर. एन. जोग, जी. बी. कुलकर्णी, सी. डी. खंडागळे, खन्नूकर, मंडोळकर, भावकाण्णा चौगुले, सुबराव पाटील, कल्लाप्पा अनगोळकर, नारायण जाधव, गंगाराम चव्हाण, पुन्नाप्पा आपटेकर, पांडू शिंदे, भरमा चौगुले, शिवाजी पाटील व मारुती शिंदे आदी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना गौरविण्यात आले.


प्राचार्य आनंद मेणसे यांनी बोलताना कॉलेजच्या एकंदर प्रगतीचा अहवाल सादर केला.

अजित सोलापूरकर यांनी सूत्रसंचालन केले. अनिल देशपांडे यांनी आभार मानले.



**बेळगाव : जीएसएस कॉलेजच्या १९६८ ते १९७२ च्या बॅचचे सर्व सदस्य, त्यांचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पुनर्मिलन सोहळ्यात एकत्र आले होते.**

# दिग्दर्शक अजित केळकर यांचा आज विशेष कार्यक्रम



**बेळगाव :** जीएसएस महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटनेतर्फे ज्येष्ठ व्यंगचित्रकार व कॉमन मॅनचे जनक आर. के. लक्ष्मण यांना मानवंदना देण्यासाठी दि. १० रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले .आहे. सायं. ६.३० वा. महाविद्यालयातील के.एम. गिरी सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमात मराठी रंगभूमीवरील ख्यातनाम कलावंत व दिग्दर्शक अजित केळकर आपल्या कलेद्वारे आर. के. लक्ष्मण यांना मानवंदना अर्पण करणार आहेत.

साज, दिल है तुम्हारा, देशदेवी, कॉर्पोरेट आदी चित्रपटांतून कला कौशल्याची छाप पाडणारे केळकर मराठी रंगभूमीवर ज्येष्ठ कलावंत म्हणून परिचित आहेत. त्यांनी झोका, आभाळमाया, पुन्हा पुन्हा प्रपंच, दुहेरी, एक धागा सुखाचा या मराठी मालिकांतून काम केले आहे. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

# 'कॉमन मॅन'ने फुलविले सर्वांच्या चेहऱ्यावर हास्य

## अजित केळकर यांच्या एकपात्री नाट्यप्रयोगाने दिले आर. के. लक्ष्मण यांच्या व्यंगचित्रांना उजाळा



बेळगाव : १) ध्वनिचित्रफितीच्या साहाय्याने अजित केळकररुपी कॉमन मॅनने आर. के. लक्ष्मण यांच्या व्यंगचित्रांचा उलगडा केला. २) कॉमन मॅन अजित केळकर.

प्रतिनिधी
**बेळगाव**

गेल्या साठ वर्षाच्या काळात प्रत्येक भारतीयांची सकाळ आपल्या मिश्कील व्यंगचित्रांनी हसतमुख बनविली. त्या आर. के. लक्ष्मण यांच्या व्यंगचित्रातील 'कॉमन मॅन' मंगळवारी जीएसएस महाविद्यालयाच्या जिमखाना सभागृहात अवतरला. ज्येष्ठ मराठी रंगकर्मी अजित केळकररुपी कॉमन मॅनने उपस्थित सर्वांना हसवून सोडले. आणि आर. के. लक्ष्मण यांच्या व्यंगचित्रांच्या आयुष्यातील प्रसंग विनोदी भाष्य करीत उलगडले.

जीएसएस महाविद्यालय ...

व्यंगचित्रकार व कॉमन मॅनचे जनक आर. के. लक्ष्मण यांना मंगळवारी अजित केळकर अभिनित एकपात्री नाट्यप्रयोगाद्वारे मानवंदना देण्यात आली. आर. के. यांच्या कर्तृत्वाला केळकर यांनी आपल्या कलेद्वारे सलाम केला. अजित केळकर यांनी आर. के. लक्ष्मण यांच्या व्यंगचित्रातील 'कॉमन मॅन'ची वेशभूषा, रंगभूषाद्वारे हुबेहुब साकारल्याने प्रेक्षकांना व्यंगचित्रच पाहत आहोत काय? असा भास झाला.

या नाट्यप्रयोगात अजित केळकर यांनी ध्वनिचित्रफिती साहाय्याने आर. के. ची व्यंगचित्रे सादरीत करीत प्रत्येक व्यंगचित्राचा ...

घोटाळे, पं. नेहरु, इंदिरा गांधी, राजीव गांधी, वाजपेयी, मनमोहन सिंग, जगजीवनराम, जनतादल, काँग्रेस आदी राजकीय पात्रांसह सामाजिक परिस्थितीवर कॉमन मॅनचा आधार घेऊन व्यंगचित्रे कशी काढली याची कहाणी या कॉमन मॅनने सांगितली. यावेळी आर. के. च्या अतिशय गाजलेल्या व्यंगचित्राबाबत तत्कालीन नेत्यांनी कसे भाष्य केले होते. हे सुद्धा या कॉमन मॅनने सांगितले. अजित केळकररुपी कॉमन मॅनने त्यावेळच्या एकूणच सर्व परिस्थितीवर 'मिश्कील' भाष सुद्धा केले. तसेच आर. के. लक्ष्मण 'व्यंगचित्र' या धारदार तलवारीद्वारे राजकीय, ...

काळ्या कारभाराबाबत कसा लढा दिला होता. यावर माहिती सांगितली. उत्कृष्ट हावभाव, नाट्य कौशल्याच्या आधारे मंगळवारच्या कॉमन मॅनकडून आर. के. लक्ष्मण यांचा प्रवास ऐकताना प्रत्येक जण गहिवरून गेला.

याप्रसंगी स्वागत प्रा. आनंद मेणसे यांनी केले. शिवाजी ओऊळकर यांच्या हस्ते अजित केळकर यांना कलात्मक भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. प्राचार्य एस. एन. देसाई यांनी आभार मानले.

यावेळी विद्यार्थी संघटनेचे माजी अध्यक्ष, माजी प्राचार्य एस. वाय. प्रभू व इतर सदस्य, विद्यार्थी मान्यवर ...

# जी. एस. एस. महाविद्यालयात संमेलन

प्रतिनिधी

बेळगाव

जीएसएस कॉलेजमध्ये भूगर्भशास्त्र विषयाचे शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचे एक दिवसीय संमेलन (प्लेनेटिसमल्स) आयोजित करण्यात आले आहे. सदर संमेलन रविवार दि. २० रोजी सकाळी १०.३० वाजता जीएसएस कॉलेजमधील सेवंतीलाल शाह सभागृहात होणार आहे.

जीएसएस कॉलेज यावर्षी आपला सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहे. याचे औचित्य साधून या संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. या संमेलनास माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. पी. टी. हणमगौड आणि प्राचार्य आनंद मेणसे यांनी केले आहे.

# जीएसएसच्या वर्गमित्रांचे ४३ वर्षांनी होणार पुनर्मिलन

## उद्या आयोजन : १२५ जणांची उपस्थिती

बेळगाव, ता. ११ : जीएसएस महाविद्यालयातील १९६८ ते १९७२ या काळातील बीएस्सीच्या विद्यार्थ्यांचा पुनर्मिलनाचा कार्यक्रम १३ डिसेंबरला महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये होणार आहे. तब्बल ४३ वर्षांनंतर त्या बॅचचे विद्यार्थी पुन्हा एकत्र येणार असून, या निमित्ताने दिवसभर विविध कार्यक्रम होणार आहेत. मुख्य कार्यक्रम सकाळी साडेदहा ते दुपारी बारा या वेळेत होणार आहे.

१९६८ ते ७२ या कालावधीत जीएसएस महाविद्यालयात बीएस्सी अभ्यासक्रमाला २३३ विद्यार्थी होते. त्यांपैकी काहीजण सध्या हयात नाहीत. काही विद्यार्थी बेळगावमध्ये स्थायिक झाले आहेत. नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने अनेकजण देशभरात विविध ठिकाणी वास्तव्यास आहेत. कार्यक्रमाच्या निमित्ताने आठवणींना उजाळा मिळणार आहे.

आंध्रप्रदेशातील व जीएसएस महाविद्यालयातून बीएस्सी झालेले रोहणीकुमार यांच्या कल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांनी महाविद्यालयातून १९६८ ते ७२ या काळातील विद्यार्थ्यांची यादी मिळवून सर्वांशी संपर्क साधला. पत्र, दूरध्वनी, ईमेल, व्हॉट्सअॅप, महाविद्यालयाचे संकेतस्थळ या माध्यमातून हे प्रयत्न झाले. सहा महिने हे प्रयत्न सुरू होते. त्यातून १२५ जणांशी संपर्क साधता आला. या कार्यक्रमात त्यावेळच्या जीएसएस महाविद्यालयातील प्राध्यापकांचाही सत्कार होणार आहे.

## Department of Geology, organized Geo-Alumni (Planetismals) meet on 20 Sept 2015






Principal A K Mense addressing the alumni members, 20 Sept 2015




On the occasion, Prof. A.K.Mense, awarded “Nation Builder Award” by Rotary E-Club Belagavi on 20 Sept 2015

# GSS College 1999 batch students Reunion 27 April 2019

https://www.facebook.com/pramod.hanamgond/posts/2364186113602122

Wonderful function and arrangements were made by 1999 batch students of GSS College, at UK27 Hotel. All student friends introduced themselves and their present endeavours. They all remembered their college days, mischiefs n campus activities, how teachers and GSS College shaped their personalities etc., Later felicitated all teachers present at the function.







G.S.S. COLL
Batc


G.S.S. COLLEGE,
Batch 19

# जीएसएस कॉलेजच्या १९९९ बॅचचा स्नेहमेळावा

## ६० हून अधिक विद्यार्थी सहभागी : २० वर्षापूर्वीच्या महाविद्यालयीन आठवणींना उजाळा




बेळगाव : स्नेहमेळाव्याप्रसंगी उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापक.

प्रतिनिधी
बेळगाव

समाजाच्या विविध क्षेत्रात स्वकर्तृत्वाने चमकणारे विद्यार्थी पाहिले म्हणजे समाधान वाटते. आणि विद्यार्थ्यांकडून प्राध्यापकांना मिळालेली हीच मोठी अपूर्व भेट असते, असे उद्गार निवृत्त प्राध्यापक प्रभू यांनी व्यक्त केले.

जीएसएस महाविद्यालयाच्या १९९९ सालच्या बीएससी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आयोजित प्राध्यापक-विद्यार्थी स्नेहमेळाव्यात ते बोलत होते. दत्तप्रसाद कुलकर्णी यांच्या पुढाकाराने प्राध्यापकांचा सत्कार व माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये ६० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. २० वर्षापूर्वीच्या आपल्या महाविद्यालयीन आठवणी व मनोगत व्यक्त करताना उपस्थित विद्यार्थी तसेच प्राध्यापक भारावून गेले होते.

विद्यार्थ्यांच्यावतीने माजी उपमहापौर रेणू किल्लेकर यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाची सुरुवात केली. प्राध्यापक प्रभू, प्रा. गाडगीळ, प्रा. कुम्बाडे, प्रा. मजली, प्रा. हळदणकर आदींचा शाल, श्रीफळ व भेटवस्तु देऊन सत्कार करण्यात आला.

हा मेळावा यशस्वी करण्यासाठी रेणू किल्लेकर, शोभा कुलकर्णी, श्रीकांत पाटील, गौतम राजणाचर, प्रताप श्रेपकर, सुशांत डांगे आदींसह मान्यवरांनी परिश्रम घेतले.

**1996-97 batch of BSc students Reunion held on 27 December 2016**

https://www.facebook.com/pramod.hanamgond/posts/3827040617316657








G.S.Sc. College
Reunion Of BSc.

Geo-Alumni Meet 8 October 2017

https://www.facebook.com/photo?fbid=1614282128592528&set=a.1614274905259917

https://www.facebook.com/pramod.hanamgond/posts/1596982253655849



The college had arranged 5 days Exhibition by Mr MF Makki, Pune, on Minerals, Rocks, Fossils etc., on the occasion of National Seminar organised by Geology department on " Zeolites & Allied Minerals" from 4-8 Oct 2017. On the occasion alumni members came together on 8th October 2017.